शोध पत्र- इतिहास

August, 2011

# मानवी विकासात इतिहासाचे योगदान

* डॉ. प्रा. सौ. एस. पी. लाखे

* इतिहास विभाग प्रमुख, नुतन आदर्श महाविद्यालय, उमरेड़, नागपूर

सुप्रसिद्ध इंग्रज विद्वान फ्रान्सिस बेकन यांनी 'मानवाला शहाणा सुज्ञ बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास होय' अशी व्याख्या करून मानवाला सुसंस्कृत, प्रगत बनविण्यात इतिहासाचे योगदान आहे हे स्पष्ट केले आहे.[1] 'इतिहास मानवी जीवनाचा आलेख' असून त्यात मानवाच्या उत्पत्तीपासून तर आजपावेतो साधलेल्या प्रगतीचा तो अखंडीत प्रवाह आहे. रानटी अवस्थेत ओबडधोबड दगडाच्या सहाय्याने आपल्या गरजा भागविणारा, कंदमुळांसाठी रानोमाळ भटकणारा मानव त्याच दगडांना सुबक आणि गुळगुळीत आकार देत शेतीकडे वळून स्थीर जीवन जगू लागला. हाच त्याच्या प्रगतीचा प्रारंभीक टप्पा होय. म्हणून पंडीत जवाहरलाल नेहरू, ''मानवाची रानटी अवस्थेकडून सुसंस्कृत अवस्थेकडे होणारे वाटचाल विशद करणारे शास्त्र म्हणजे इतिहास'' असे नमुद करून मानवी विकासात इतिहासाचे योगदान असल्याचे दर्शवतात.[2] शेतीतून एकत्रीत कुटूंबपद्धतीचा उगम झाला. 'एकमेकांसाहय करू' यात वस्तूंच्या आदानप्रदान प्रक्रियेतून तो व्यापारी बनला. इतरांच्या संपर्काने त्याच्या आचार, विचार, राहणीमान, धार्मिक कल्पना यात बदल झाला. वेगवेगळया कल्पनांचा, शास्त्राचा उगम झाला. त्यावर त्याचा विश्वास वाढत गेला. मानवजातीच्या प्रगतीचे निदर्शक असणारी युगे पहिल्यांदा थॉम्पसन या डॅनिश वस्तुसंग्रहालयाच्या संचालकाने दाखवून दिली. त्याने जवळ असणारी आयुधे अश्मयुग, ब्रान्झयुग, लोहयुग या क्रमाने मांडली. अश्मयुगापासून ताम्रयुग लोहयुग असा त्याचा प्रवास प्रगतीपथावर राहीला म्हणून गो.स. सरदेसाईच्या शब्दात, ''मानवी प्रगतीचा आढावा म्हणजे इतिहास'' या परिभाषेत तो सामावला. यावरून इतिहास म्हणजे फक्त घटनांची यादी नव्हे तर मानवी जीवनाच्या वाटचालीचा आलेख होय.[3] कोसंबी प्रमाणेच इतर इतिहासकारही याला मान्यता देतात.[4] मानवाला आपले जीवन सुखी व समृद्ध करून आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करणे आवश्यक वाटले. अशाच घटनांची नोंद इतिहासात आहे. त्यातून त्याच्या निश्चित उद्दिष्टांचा परिचय होतो.

आधुनिक काळातही मागे टाकेल अशी प्रगती पथावरची सिंधूसंस्कृती[5], ऋग्वेदकाळात आर्यांनी आपले तत्वज्ञान आणि नितीकल्पनांवर विकसीत केलेली जीवनशैली[6], उत्तरवैदिक काळात या तत्वज्ञानाला, नितीकल्पनांना आलेले संदिग्ध रूप[7] आणि त्यातून जैन व बौद्ध तत्वज्ञानाच्या रूपाने नवविचारांची झालेली निर्मिती[8] छोटया टोळयाचा, ग्रामाच्या एकत्रीकरणातून मगधसारख्या राज्याचा उदय[9], भारतीय जीवन शांत स्थीर असतांना भारतावर इ.स.पुर्व 200 ते 300 या काळात अलेक्झांडर, ग्रीक, शक, कुशाण याची झालेली आक्रमणे[10], त्याचे भारतीय समाजजीवनावर झालेले परिणाम, संस्कृतीच्या आदानप्रदानातून मानवाने साधलेला विकास यांची नोंद इतिहासात आहे. म्हणून थ्युसिडिडिज आणि पॉलिबस म्हणतात ''इतिहासातील अशाच गोष्टी मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या ठरतात''[11]. सातवाहन, वाकाटक, गुप्त, वर्धन अशी भारतात उदयाला आलेली घराणी व राज्ये[12], त्यांची वेगवेगळी शासनप्रणाली, त्यांचे बरेवाईट परिणाम, अरब, गझनी घोरीची भारतावरील आक्रमणे आणि त्यांचा सामना करतांना भारतीयांना आलेले अपयश, बाबरापासून तर औरंगजेबापर्यंत भारतीयांनी अनूभवलेले, सोसलेले मोगल साम्राज्य[13], प्रत्येक शासकागणिक त्याच्या जगण्यात आलेली परिवर्तने आणि त्यातून त्याने साधलेला विकास म्हणून बर्कने, ''इतिहासाचा संबंध सतत घडणाऱ्या बदलाशी असतो'' हे सांगून मानवाला ते सहाय्यक ठरतात हे दर्शविले आहे.[14] ब्रिटीशाच्या आगमनानंतर भारतीयांची पाश्चात्य ज्ञान–विज्ञानाशी झालेली ओळख, अमेरिकन, फ्रेंच, या राज्यक्रांतीचा त्यांशी संबंधीत थोर विचारवंताचा, त्यांनी रूजविलेल्या नवमुल्याचा परिचय मानवाच्या विकासाचा एक पथकरी ठरला. म्हणूनच 'इतिहास एकप्रकारे मानवाला दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतो' असे म्हटले जाते. मानवाने क्रमाक्रमाने साधलेला स्वतःचा विकास याची माहिती इतिहासातून मिळाली की उत्क्रांती तत्वाचा बोध होतो आणि मानवी जीवनाच्या उद्दीष्टांचाही अर्थबोध होतो. प्रत्येक ज्ञानशाखेला इतिहासाच्या कक्षेतून अध्ययन करता येते. मानवाने वेगवेगळया कालखंडात कोणते विचार कार्य केले आणि त्याने कसा विकास साधला याची माहिती कळते. स्वातंत्र्यकाळात 'इब्न खल्दून' या मुस्लीम इतिहासकारनेही 'संस्कृतीचा अभ्यास करण्याची पद्धत सुरू करून मानवी समाजाचा विकास कसा होत गेला' याचा अभ्यास सुरू केला. 'मानवाच्या वाढत्या गरजांमधून मानवाने विकास साधल्याचे त्याच्या लिखाणातून त्याने स्पष्ट केले'.[15] ब्रिटीश काळात भारतीय समाजसुधारकांनी जनसामान्यांच्या कर्तृत्वशक्तीवर विश्वास दाखवून भारतीयांमध्ये एकप्रकारचा आत्मविश्वास निर्माण केला. ॲंड्रयुज आणि मुखर्जी यांच्या मते ''भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ आणि प्रसार ज्यामुळे मानवी प्रगतीच्या दिशा आम्हाला समजल्या पाश्चात्य ज्ञान विज्ञानाशी आमची ओळख झाली.''[16] स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, लोकशाही ही तत्वे अभ्यासल्या गेली. दळणवळणाच्या साधनातून एक संघटन निर्माण झाल्याने एकमेकांच्या आचार–विचाराचे आदानप्रदान होवून त्यातून वैचारिक, सामाजिक, बौद्धिक विकास साधल्या गेला. परंपरागत रूढी परंपराच्या जोखडातून मुक्ती मिळून

नवविचारांची कास धरल्याने उदयाला आलेल्या बुद्धीवाद्यांनी मानवाचाच नाही तर देशाचाही विकास साधला. या वर्गात नवे आत्मसात करण्याची लालसा त्यामुळेच एकेकाळी रानटी अवस्थेत भटकणारा मानव चंद्रावर पोहचल्याचे दिसून येते. पाश्चात्याच्या प्रभावाने शेतीचे व्यापारीकरण आणि कुटीर उद्योगाचा ऱ्हास जरी झाला तरी त्यातूनच शेतीच्या नवनवीन तंत्राची ओळख झाली. यंत्रावर आधारीत उद्योगाचा उदय झाला. इतिहासाने आम्हाला जुनी जळमटे काढून टाकण्यास प्रोत्साहीत केले.[17] स्वातंत्र्यानंतर इतिहासाने आम्हाला शिकविले कारण भारत–चीन, भारत–पाक शेजारी राष्ट्राशी झालेल्या युद्धात भारतीयांमध्ये निर्माण झालेले राष्ट्रप्रेम, संघटनवृत्ती आजही भारतावर आलेल्या बाहय संकटासाठी प्रेरणादायी ठरेल. इतिहास हा मानवी प्रवृत्तीशी संबंधीत असल्याने मनूष्याला मागे वळून पाहता येते. गतकाळात मानवाने साधलेला विकास, त्यांनी केलेल्या चुका आणि तशा प्रकारच्या चुका पुन्हा होवू नये याची जाणीव इतिहासातून होते. केवळ भारतीयच नाही तर जगातल्या इतर राष्ट्रांनी साधलेल्या प्रगतीतून मानव काहीतरी अवगत करू शकतो.

कधी–कधी मानवाला अधोगतीचाही सामना करावा लागतो. स्वतःच्या वाढत्या गरजाच्या पुर्ततेसाठी मानव निसर्गावर मात करू लागला आणि तोच निसर्गाचा बळी ठरत आहे. युद्धातील मानवी संहार, अण्वस्त्रांचा, विषारी वायूच्या वापराने, पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. स्वतःच इच्छा, आकांशाच्या पुर्तीसाठी असंतुष्ट गटाने दबावतंत्र म्हणून दहशतवाद अवलंबलेला आहे. या सर्व गोष्टीच्या उदयाला कारणीभूत परिस्थितीचा तो शोध घेवून त्यावर उपाययोजना शोधू शकतो. नवनवीन विकसीत झालेल्या इंटरनेट, ई–मेल, मोबाईल, टेलीकॉन्फरन्सिंग या तंत्रविज्ञानाच्या माध्यमातून संपूर्ण विश्वाकडे तो लक्ष वेधू शकतो. ज्ञान संपादन करू शकतो.

एकंदरीत इतिहासाच्या ज्ञानाने वर्तमान काळाच्या अनूभुतीला भक्कमपणे येतो व भविष्यकाळासाठी मार्गदर्शन ठरते. भुत आणि वर्तमान काळातील घटनांचा अर्थ आणि अन्वयार्थ लावता येतो. मानवाच्या राजकीयच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक आणि आर्थिक विकास कसा झाला याचा शोध घेता येतो. ज्या महान विभुतींनी, सामान्य जनांनी, वंचित समुहाने आपले योगदान दिले असेल त्या कर्तुत्वातून आपले मार्ग, ध्येय धोरणे निश्चित होतात. व्दिधृवीकरणातून एकधृवीकरणाकडे वाटचाल करणाऱ्या अमेरिकेने खेळलेल्या कुटनितीतून उदयाला आलेल्या दहशतवादी कृत्याचा आढावा घेतांना[18] इतर राष्ट्रांच्याही परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासातून आपलाही आंतरराष्ट्रीय दृष्टीकोण बदलतो. आपल्या पुर्वजाचा परिचय इतिहासातून मिळत असल्याने गतकालीन संस्कृतीचा वारसा इतिहासाकडून प्राप्त होतो. तो एका पीढीकडून दुसऱ्या पीढीकडे संक्रमित होतो. प्रत्येक ज्ञानशाखेला इतिहास असल्याने इतिहासाच्या प्राचीन ज्ञानातून विकासाचे पुढील टप्पे गाठता येतात. यातून आपल्या सुप्तगुणांना वाव मिळून आपला बौद्धिक विकास साधता येतो. तर्कनिष्ठा, सत्यसंशोधनवृत्ती, समतोलपणे व वस्तुनिष्ठता कायम ठेवून निर्णय घेण्याची क्षमता इतिहासातून मिळते.म्हणूनच इंग्रज विचारवंत व संसदपटू एडमंड बर्क, 'इतिहास म्हणजे दुरदर्शीपणाचा मार्गदर्शक होय' असे मत मांडतो[19] हाच मार्गदर्शक मानवाला शहाणा, सुज्ञ बनवितो. म्हणूनच फ्रान्सिस बेकन, ''मानवाला शहाणा बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास'' असे सांगून मानवी विकासात इतिहासाचे योगदान आहे हे जणू मान्य करावयास लावतो.[20]

## संदर्भ ग्रंथ

1) सरदेसाई डॉ. बी.एन : इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2005, पृ. 3 2) सातभाई डॉ. श्रीनिवास : इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2001 पृ. 326 3) कोठेकर डॉ. शांता : इतिहास! तंत्र आणि मंत्र, श्री साईनाथ प्रकाशन, 2005, पृ. 4 4) सरदेसाई : पृ. 3 5) आठल्ये विभा : प्राचीन व मध्ययुगीन भारत, अंशुल पब्लीकेशन्स, 1999, पृ. 1 ते 11 6) कित्ता : 28 ते 31 7) आचार्य धनंजय : भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर, 2008, पृ. 28 ते 30 8) दिक्षीत नि.सी. : भारताचा इतिहास, पिंपळापुरे प्रकाशन, 2002, पृ. 57 ते 82 9) कित्ता 10) पवार जयसिंगराव : भारताचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास भारती मुद्रणालय, कोल्हापूर, पृ. 33 ते 35 11) गायकवाड प्राचार्य आ.डी., सरदेसाई, हनमाने : इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, 1986, पृ. 19 12) पवार : पृ. 35 13) आचार्य : पृ. 292–294 14) कोठेकर : 190 15) शेख अली बी. : हिस्ट्री इट्स थिअरी ॲण्ड मेथड, पृ. 209 16) सरदेसाई : 167 17) दिक्षीत नी.सी. : मराठे व ब्रिटीशकालीन भारत, पिंपळापुरे प्रकाशन, 1988, पृ. 69 ते 71 18) उदगावकर प्र.न. : दहशतवाद, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, 2009, पृ. 1 ते 5 19) सातभाई : 327 20) सरदेसाई : 3